भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.६१७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०९/२०१७

**१) जिवे मारण्याच्या उद्येशाने चाकुने मारुन गंभिर जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०१/०९/२०१७ चे ०९.३० वा. दर. यातील आरोपी हा फिर्यादीचा दुसरा पती असुन तु मला अंगठी, गोफ व कपडे का नेऊ देत नाही असे म्हणुन सोबत आनलेल्या चाकुने आरोपीने फिर्यादीला जिवे मारण्याच्या उद्येशाने चाकुने छातीवर, हातावर व मानेवर मारुन गंभिर जखमी केल्याने फिर्यादी सौ. रंजना सुरेन्द्र देशमुख वय ३१ वर्ष, रा. रेल्वे क्वार्टर वरठी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. वरठी येथे कलम ३०७ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. राऊत पो.स्टे वरठी हे करीत आहेत.

**२) ऑटोच्या धडकेत एक गंभिर जखमी :—**

दिनांक २३/०८/२०१७ चे १७.०० वा. दर. पर्यंत यातील फिर्यादी संघरत्न शंकर ऊईके वय ३५ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड वरठी हा आपले मोटार सायकल क्र. एमएच ३६ एन ०२६४ ने सासुर वाडीला खरबी मोहाडी येथे जात असता संत ज्ञानेश्वर सभागृह जवळ वरठी टर्ण घेत असता मागेहुन येणाऱ्या आरोपी चालकाने आपले ताब्यातील ऑटो नं. माहीत नाही हा भरधाव वेगाने, निष्काळीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला धडक मारुन गंभिर जखमी करुन पडुन गेल्याने व जखमी हा लक्ष हॉस्पीटल मध्ये उपचार केल्यानंतर आज दिनाक ०१/०९/२०१७ ला पो. स्टे. ला येवुन तक्रार दिल्याने पो.स्टे. वरठी येथे कलम २७९,३३८ भादवी. सहकलम १८४,१३४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा कुंभलवार पो.स्टे वरठी हे करीत आहेत.

**३) गालावर थापड मारुन दगडावर जमीनीवर पडल्याने डोक्याला मार लागुन तो जागीच मरण पावल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०१/०९/२०१७ चे १२.०० वा. ते १३.०० वा. दर. यातील फिर्यादी नंदलाल मिताराम वरखडे वय ४५ वर्ष, रा. खापा यांचे गावाचा गणेश वरखडे याने फिर्यादीस फोनव्दारे कळविले की ग्राम बोरगाव येथील आरोपी याने त्याचा काका मृतक फत्तु पिंटु वरखडे वय ६० वर्ष, रा. खापा ह. मु. गराडा यास गालावर थापड मारल्याने मृतक हा दगडावर जखमीनीवर पडल्याने त्याच्या डोक्याला मार लागुन तो जागीच मरण पावल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. किचक पो.स्टे अडयाळ हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) जादुटोना करण्याच्या कारणावरुन समाजात अंधश्रध्दा पसरवुन भिती निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १९/०८/२०१७ चे १२.३ ते १६.०० वा. दर. यातील आरोपीने स्वत:चे घरी खाजगी मंदीरात देवीचा दरबार भरवुन फिर्यादीस तु जादु टोना करणी केलास तु साप पोसुन पाटविलास आणि मनीष निर्वाण रा. लाखनी यास साप चावला असे म्हणुन समाजात अंधश्रध्दा पसरवुन भिती निर्माण केल्याने दिनांक १९/०८/२०१७ चे लेखी अर्जाची चौकशीची शहानिशी करुन फिर्यादी सुरेश मारोती निर्वाण वय ५२ वर्ष, रा. वार्ड नं. १३ निर्वाण मोहल्ला लाखनी यांनी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ५,६ महाराष्ट्रनरबळी अधिनीयम व इतर अमानुष अनिष्ठ व जादुटोना अधिनीयम २०१३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. यादव पो.स्टे दिघोरी हे करीत आहेत.

५) एटीएम कार्ड बदली करुन एटीएम मधुन पैसे काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ०१/०८/२०१७ चे १३.४५ वा. दर. यातील फिर्यादी सिताराम तुळशिराम मेश्राम वय ७३ वर्श, रा. राऊ कॉलेनी सहकार नगर भंडारा हे एटीएम मध्ये १५,०००/–रु. भरण्यास गेले असता एटीएम म्हणुन शेजारील ऊभा असलेल्या अनोळखी २८ वर्षीय मुलाने पैसे जमा करुन दिले व यादरम्यान फिर्यादीचा एटीएम कार्ड बदली करुन दुसरा कार्ड फिर्यादीस दिला व फिर्यादीचे कार्ड व्दारे ८०,०००/–रु. काढुन फिर्यादीची फसवणुक केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे ४२० भादंवि. सहकलम ६६(ड) माहिती तंत्रज्ञान कायदा. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. तुलुरे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

६) अवैध दारु/ जुगार अडयावर धाडी . :–

दिनांक ०१/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. कारधा, करडी व लाखांदुर येथे दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५ लिटर हातभटटी दारु किंमती १५००/–रु. व १ लिटर १३५ मिली लिटर देशी दारु किंमती ३७५/–रु. तसेच जुगारातुन किंमती ३२८२ चा माल असा एकुन ५,१५७/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह) भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.